दि.दावा क. ७३/२०१४
नि.क्र. ६४

**<u>प्रतिवादी साक्षीदार क.१ चा पूढील उलटतपास ॲड. श्री. पोंगडे यांचे मार्फत पूढे शपथेवर सुरू :-</u>**

हे म्हणणे खरे आहे की, आजोबा महादेव यांचा रामदास नावाचा एक भाउ होता. हे म्हणणे खरे आहे की, या दोघांमध्ये वडिलोपार्जीत मिळकतींचे वाटप झाले होते व प्रत्येकी १२ एकर शेतजमीन त्यांना मिळाली. आजोबा महादेव यांचे निधन १९७७ मध्ये झाले किंवा कसे, हे मी निश्चीत सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजोबांना शांती, कौशल्या व सुभद्रा अशा तीन बहिणी होत्या व आजमितीस त्या हयात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, तिघी बहिणींनी आजोबांना मिळालेले १२ एकर शेतीमधील आपले हक्क सोडून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आजी देवकाबाई हिचे निधन सन २००५ मध्ये झाले. माझे म्हणण्याप्रमाणे १९८७ मध्ये जो आपसी वाटणीपत्र झाले ते रेव्हन्यू रेकॉर्डप्रमाणे लेखी होते. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: असा लेख पाहिलेला नाही. मला रेव्हन्यू अधिकारी यांचेकडून लेख गहाळ झाला आहे, असे सांगण्यात आले आहे. तत्कालीन तहसिलदार यांनी आग लागल्याचे घटनेमध्ये गहाळ झाल्याचे माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, वाटणीचा लेख गहाळ झालेबाबत मी कोणतेही प्रमाणपत्र मिळविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे अशी कोणतीही वाटणी होवून त्याप्रमाणे लेखही झालेला नाही.

दि. २५.५.२००९ रोजीचे वाटणीपत्राचा लेखही याकामी दाखल केलेला नाही. माझी आत्या रमाबाई हिचे निधन सन २००० मध्ये झाले आहे. आजोबांची बहिण शांती कांबळे यांचे निधन १९९८, कौशल्या कांबळे यांचे निधन ९.४.२००० व सुभद्रा कांबळे यांचे निधन २०.१०.२०१४ रोजी झाले किंवा कसे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींचा दावा मिळकतीमध्ये बरोबरीचा हिस्सा आहे व माझे वडिलांनी महसुल अधिकारीला

हाताशी धरून खोटे रेकॉर्ड तयार केले आहे. आता मला नि.६६ ची फेरफार नोंदवही दि.२५.६.१९८७ चा उतारा दाखविला. हे म्हणणे बरोबर आहे की, यावर त्यांच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, संपूर्ण दावा मिळकत ही आम्ही प्रतिवादी क्र.१ व २ यांचे एकटयाचे कब्ज्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेती ओलीत आहे. यामध्ये आम्ही तुर, सोयाबीन असे पीक घेतो. हे म्हणणे खरे नाही की, कपासीही घेतो. आम्हाला सुमारे वार्षिक सरासरीने ८०,०००/- ने उत्पन्न मिळते. यामध्ये ४०,००० ते ५०,००० खर्च होत असतो. हे म्हणणे खरे नाही की, खर्च वजा जाता ६०,०००/- ते ७०,०००/- उत्पन्न मिळते.

आजोबांचे भाऊ रामदास यांचे १२ एकर शेतीची कागदपत्र दाखल केलेली नाहीत. मला त्याची आवश्यकता वाटत नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र केले व खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले.
समक्ष,

(एस.व्ही. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
उमरेड.
दि.१९.०४.२०१८